## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १२३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०२/२०१७

**१) गॅरेजमधील शर्टसचा ताला तोडुन आत प्रवेश करुन साहीत्याची चोरी . :–**

दिनांक ०३/०२/२०१७ चे २०.०० वा ते १६.०२.२०१७ चे ०८.३० वा. दर. यातील फिर्यादी पींटु इंद्रजीत सींग वय ३६ वर्ष, रा. गांधी वार्ड देव्हाडी हा आपले यशवंत सर्वीसींग गॅरेज दिनांक ०३/०२/२०१७ ते १६.०२.२०१७ पर्यत बंद करून पत्नीचे उपचारा करिता बाहेर गावी गेला असल्याने कोणीतरी अज्ञात आरोपीने सुना मौका पाहुन गॅरेजच्या समोरील शर्टसचा ताला तोडुन आत प्रवेश करुन गॅरेज मध्ये ठेवलेले टाटा कंपनीची मारोती व्हॅनची बॅटरी, एक्सल पुलर, लोखंडी गॅस लीव्हर, लोखंडी पाण्याचा सेट, २ टायर, ब्रेक डिक्स बुस व हायड्रोलीक पंप असा एकुण ५०,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४६१,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीवास पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहे

**२) मोटार सायकल दुकानातील मोटार सायकल व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक १९/०२/२०१७ चे ०१.०० ते ०६.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी शैलेश इद्रराजसिंग बैस वय ४३ वर्ष, रा. पंचशील वार्ड साकोली याचे अभिजीत मोटार दुकानाचे यातील संशयीत आरोपीने सुना मौका पाहुन मागील दाराचा लाकडी दरवाजा तोडुन आत प्रवेश फिर्यादीचे दुकानातील टिव्हीएस कंपनीची मोटार सायकल किंमती ६५,०००/–रु. गल्यातील ३५,८००/–रु. व बाजुला असलेल्या श्रीचंद मंजानी याचे किराणा दुकानाचे गल्यातील अंदाजे नगदी ६,०००/–रु. असा एकुण १,६,८००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गायकवाड पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन विधी संघर्ष बालाकांनी लॉनमधील साहीत्याची चोरी . :–**

दिनांक १९/०२/२०१७ चे १६.०० ते १६.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी विधी संघर्ष बालकांनी संगनमत करुन फिर्यादीचे लॉनच्या गेटवर बसुन चर्चा करीत असतांना ९ ते १० वर्ष, वयोगटातील १ मुलगा झिल्लीत सामान भरुन गेटचे बाहेर जातांना दिसला असता त्यास थांबवुन हातातील झिल्लीची पाहाणी केली असता वामलेश कंपनीची दिवाल घडी, गणेश मुर्ती असलेली काचेची शोकेस, पानपुडा, काचेचा बल सेट, १ छोटा फ्लॉवर प्लॉट, स्टिलचा रसना कंपनीचा ग्लॉस सेट असा एकुण ५००/रु. चा माल नजर चुकवुन चोरुन नेतांना मिळुन आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. सोनपिपरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) तलावाच्या पाण्यात बुडुन बालाकांचा मृत्यु . :–**

दिंनाक १८/०२/२०१७ रोजी १४.३० वा. दरम्यान यातील मृतक ऐयाती गजानन ठाकरे वय ११ वर्ष, रा. लाखांदुर हा आपल्या मित्रासह पिंपळगाव रोडच्या बाजुला असलेल्या मामा तलावात आंघोळ करण्यास गेला असता मृतक हा रात्री घरी परत न आल्याने मृतक सोबत गेलेल्या त्याच्या मित्रास विचारपुस करुन आज रोजी मामा तलाव पिंपळगाव कोहळी येथे त्याचा शोध घेतला असता तलावाच्या पाण्यात बुडुन मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी कामन रामजी मेश्राम वय ५३ वर्ष, रा. वडसा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे १७४ कलम जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयर पो. स्टे. लांखादुर हे करीत आहे.

**५) प्रकृती बिघडल्याने औषधोपचारा दरम्यान महीलेचा मृत्यु . :—**

दिनाक १८/०२/२०१७ रोजी १३.३० वा. दरम्यान यातील मृतक सौ. अनुसया मदन रंगारी वय ५० वर्ष, रा. चिचाळ हिची प्रकृती बिघडल्याने तिला औषधोपचारा करीता ग्रामीण रुग्णालय लाखांदुर येथे आनले असता तेथील डॉक्टरनी तपासुन मरण पावल्याचे घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे लाखांदुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपालाव्दारे पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. चाचेरे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो. स्टे. दिघोरी हे करीत आहे.

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.